तक्रारदार यांचा तक्रार अर्ज ०८/१२/२२ | तक्रारदार यांना देण्यात आलेले समज पत्र | ठाणे दैनंदिनी प्रत | अंतरिम अहवाल

FORM-1 A N.C.R.B.
I.I.F.-1 24

# पहिली खबर
## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लाप्रवि मुंबई पहिली खबर क्र. 15, वर्ष 2025 दिनांक 31/03/23
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम 1988, कलमे Sections 7, 7(अ)
(ii) अधिनियम Act ........................, कलमे Sections ........................
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........................

3. (a) अपराधाची घटना : वार गुरुवार तारीख पासून 08/12/22 वेळ 18:00 वा तारीख पर्यंत 09/12/22 वेळ 20:30 वा
Occurrence of offence : Day Date from, Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख 08/12/2022, वेळ ........................
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 15/2023, तारीख 31/03/2023, वेळ 12:15.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : समक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........................, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........................
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव मंत्रालय मुंबई ठिकाणाचे नंबर ........................, गल्ली ........................, रस्त्याचे नाव ........................
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........................, गाव ........................, पोस्ट ........................, तालुका ........................, जिल्हा ........................, राज्य ........................
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........................, तालुका ........................, जिल्हा ........................, राज्य ........................
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name श्री उदास तुळसे (b) वडीलाचे / पतीचे नाव दाजी तुकसे
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 51 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 8693861977
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........................ दिल्याचा दिनांक ........................ दिल्याचे ठिकाण ........................ (f) व्यवसाय नोकरी
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........................, जनजात Sub-Caste ........................
(h) पत्ता : सुपरवायझर क्वार्टर्स, बिल्डींग नं. [illegible], रूम नं. 18, वरळी सी.फेस, वरळी, मुंबई 400 018. गल्ली / सर्व नं. ........................ घर / नांव नंबर ........................ फोन / मो. नंबर ........................ पॅन नं. ........................ वोटर्स नं. ........................
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव ........................ जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........................ गाव ........................ पोस्ट ........................ पो. स्टे. ........................
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........................ जिल्हा ........................ राज्य ........................ सध्याचा पत्ता ........................
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

श्री प्रशांत दामोदर थटिरे (वरिष्ठ लिपीक) नेमणूक - कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी श्री उदास तुळसे यांचा सविस्तर जबाब स्वतंत्र कागदावर संगणकावर टंकलिखीत करण्यात आला असुन तीच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(विद्या जाधव)
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई

जबाब                                                    दिनांक ३१/०३/२०२३

श्री उदास दाजी तुळसे, वय ५१ वर्षे, धंदा – नोकरी (सुरक्षा अधिकारी), कार्यालय – आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास विभाग, वरळी सि फेस, वरळी, मुंबई राठि – सुपरवायझर क्वॉर्टर्स, बिल्डिंग नंबर – बी, रूम नंबर १६, वरळी सि फेस, वरळी, मुंबई ४०००१८. मोबाईल नंबर ८६९३८६१९७७.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुटूंबासोबत राहावयास आहे, मी आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास विभागामध्ये सुरक्षा अधिकारी या पदावर कार्यरत आहे. माझेवर दिनांक ०३/०८/२०२१ रोजी लाप्रवि, वरळी विभागातर्फे सापळा कारवाई करण्यात आली होती. सदर कारवाईनंतर माझेवर खात्यामार्फतीने कारवाई होवून मला सेवेतून निलंबित करण्यात आले होते. सदर निलंबनानंतर मला दिनांक ०४/०८/२०२२ रोजी पुन्हा खात्यात रूजू करण्यात आले. त्यानंतर माझी बदली आयुक्त दुग्धविकास कार्यालय, वरळी या ठिकाणावरून शासकीय दुग्धविकास योजना कार्यालय, मिरज, सांगली या ठिकाणी दर्शविण्यात आली. परंतू मी कौटूंबिक व वैद्यकीय कारणास्तव मुंबईमध्ये उपमुख्य दक्षता अधिकारी, वरळी येथे व सुरक्षा अधिकारी, आरे वसाहत येथे बदली होण्याबाबत मा. प्रधान सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मस्त्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दिनांक ०३/०८/२०२२ रोजी अर्ज केला होता. सदर अर्जावर होकारार्थी शेरा मिळाल्याने माझी आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, वरळी मुख्यालय, मुंबई येथे बदलीचे आदेश तयार करण्याकरीता लोकसेवक श्री मराळे (उप सचिव, दुग्ध विभाग, महाराष्ट्र शासन) व लोकसेवक श्री अहिरे यांनी माझेकडे रूपये १,००,०००/– रकमेच्या लाचेची मागणी केली. मला लोकसेवकास लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी दिनांक ०८/१२/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे लोकसेवक श्री मराळे व श्री अहिरे यांचेविरूध्द लेखी तक्रार दिली.

सदर वेळी लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठांनी माझे तक्रारीच्या अनुषंगाने कारवाईकरिता पोनि. विद्या जाधव व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून सपोआ नितीन जाधव यांची नेमणुक केली. पोनि. विद्या जाधव यांनी पडताळणी व कारवाईकरीता स्वत:चे, माझे व दोन पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पोनि. विद्या जाधव यांनी माझी व पंचाची पडताळणी कारवाईच्या पोलीस पथकासोबत ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. विद्या जाधव यांच्या सुचनेप्रमाणे मी, सपोआ नितीन जाधव, पोनि विद्या जाधव, दोन पंच व पोलीस पथक असे पोलीस वाहनाने सेंट जॉर्ज रूग्णालयाच्या आवारात आलो. ती वेळ २०.०० वाजताची होती. पोनि विद्या जाधव याचे सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल क्रमांक ८९२८१६५८१३ वरून लोकसेवक श्री अहीरे यांचे मोबाईल क्रमांक ८७७९७३९८१९ वर फोन करून भेटण्याच्या ठिकाणाबाबत विचारणा केली असता, लोकसेवक श्री अहीरे यांनी मला सेंट्रल बार, हुतात्मा चौक या ठिकाणी येण्यास सांगितले.

पो.नि. विद्या जाधव यांनी मला व पंच क्र. १ श्री बगळे यांना पडताळणी कारवाई दरम्यान घ्यावयाच्या खबरदारीच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही सर्व शासकीय वाहनाने सेंट जॉर्ज रूग्णालयाच्या आवारामधून हुतात्मा चौकच्या दिशेने रवाना झालो. हुतात्मा चौक परिसरात गेल्यानंतर तेथे पाहणी केली असता, आजूबाजूस कोठेही सेंट्रल बार दिसून आला नाही. त्यामुळे पोनि विद्या जाधव यांनी मला लोकसेवक श्री अहीरे यांना फोन करून भेटण्याच्या ठिकाणाबाबत पुन्हा विचारणा करण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी पुन्हा माझे मोबाईल क्रमांक ८९२८१६५८१३ वरून लोकसेवक यांचे मोबाईल क्रमांक ८७७९७३९८१९ यावर फोन केला व ते हुतात्मा चौक येथे असून त्यांना सेंट्रल बार मिळून आला नसल्याचे सांगितले असता, लोकसेवक श्री अहीरे यांनी मला सेंट्रल बार, सिएसटी जवळ असून त्या ठिकाणी भेटण्यास बोलाविले. त्याप्रमाणे मी, पंच क्र. ०१ श्री

समक्ष

( विद्या जाधव )
पोलीस निरीक्षक ,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

बगळे असे चालत सेंट्रल बार शोधत रवाना झालो. परंतु सेंट्रल बार नजीकच्या परिसरात नसून सिएसटी स्थानकाजवळ असल्याने मी व पंच क्र. १ श्री बगळे परत पोलीस वाहनाजवळ आलो. त्यानंतर आम्ही सर्व पोलीस वाहनाने सिएसटी रेल्वे स्थानक मार्गावरील बॉम्बे जिमखानाच्या समोरील गल्लीत गेलो. पोनि. विद्या जाधव यांचे सुचनेप्रमाणे मी, पंच क्र. ०१ बगळे असे चालत सेंट्रल बारच्या दिशेने रवाना झालो. सेंट्रल बार, सिएसटी रेल्वे स्टेशनजवळ या ठिकाणी गेल्यानंतर मी आत जावून लोकसेवक श्री अहीरे बसले होते त्या टेबलवर जावूनवर बसलो. त्यावेळी लोकसेवक यांचेसोबत दोन इसम हजर होते. त्यांचेशी लोकसेवक श्री अहीरे यांनी माझी ओळख करून दिली. त्यातील एक इसम आमचे डिपार्टमेंट मधील लिपीक असून दुसरा इसम अभ्युदय बँकेत नोकरी करीत असल्याचे सांगितले. त्यावेळी पंच क्र. ०१ हे माझे समोरील रो मधील पहिल्या टेबलवर बसले होते. त्यावेळी मी लोकसेवक श्री अहीरे यांना माझे बदलीच्या ऑर्डरबाबत विचारणा केली असता, त्यांनी मला उदया भेटा व आधी ठरल्याप्रमाणे घेवुन या असे सांगीतले त्यानंतर आम्ही बाहेर पडल्यानंतर मला हाताने ५ बोट दाखवून इशारा केला असता, मी त्यांना मला पन्नास हजार जमणार नाही, मी तुम्हास वीस किंवा तीस हजार देईन असे सांगितले. यांवर लोकसेवक श्री अहीरे यांनी मला उदया पैसे घेवून ये व साहेबांना भेटून ऑर्डर घेवून जा असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र. ०१ श्री बगळे असे पोलीस वाहनाजवळ परत आलो. पोनि विद्या जाधव व सपोआ नितीन जाधव यांनी माझेकडे लोकसेवकाच्या भेटी दरम्यान झालेल्या संभाषणाबबत विचारणा केली असता, मी वरीलप्रमाणे हकिगत सांगितली. लोकसेवक श्री अहीरे यांनी लाचेची मागणी ही हाताच्या इशाऱ्याने केली असून लाचेची मागणी व रक्कम स्पष्ट सांगितली नसून लोकसेवक हयानी मला लाचेच्या रक्कमेकरिता व तक्रारदार यांच्या कामासाठी दिनांक ०९/१२/२०२२ रोजी कार्यालयात येवून मोठया साहेबांना भेटण्याकरिता सांगितल्याने पोनि. विदया जाधव व सपोआ नितीन जाधव यांनी दिनांक ०९/१२/२०२२ रोजी पुन्हा पडताळणी कार्यवाही करण्याचे सांगितले व मला, पंचांना व पोलीस पथकास दिनांक ०९/१२/२०२२ रोजी सकाळी ०९:०० वाजता लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

दिनांक ०९/१२/२०२२ रोजी पोनि. विद्या जाधव यांनी पडताळणी कारवाईकरीता स्वत:चे, माझे व दोन पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पो.नि. विद्या जाधव व सपोआ नितीन जाधव, मी, दोन्ही पंच व पोलीस पथक असे १५:१५ वाजता पडताळणी करीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयातुन बाहेर पडून योगक्षेम, एल.आय.सी. कार्यालय, मुंबई येथे गेलो. मी आणि पंच क्र. ०१ असे लोकसेवकाच्या कार्यालयात भेट घेतली असता, लोकसेवक श्री. अहिरे हे मला लोकसेवक श्री. मराळे यांचे केबीनमध्ये भेट घेण्याकामी घेवून गेले. सदर वेळी माझे व लोकसेवक श्री. मराळे यांच्यामध्ये माझ्या बदलीच्या आदेशाबाबत बोलणे झाले असता, लोकसेवक श्री. मराळे यांनी मला 'देवून टाका' असे सांगितले. त्यावर मी किती देवून टाका अशी विचारणा लोकसेवक श्री. मराळे यांना करत असताना तेथे उपस्थित असेलेले लाकसेवक श्री. अहिरे हे मला केबीन बाहेर घेवून आले. मी केबीन बाहेर आल्यांनतर त्यांनी लोकसेवक श्री. अहिरे यांना विचारले की बदलीच्या कामासाठी लोकसेवक श्री. मराळे यांनी किती पैसे मागीतले आहेत त्यांवर लोकसेवक श्री. अहिरे यांनी सध्या पन्नास दया असे सांगितले त्यावेळी मी लोकसेवक श्री. अहिरे यांना सदर कामासाठी लोकसेवक श्री. मराळे यांना सांगुन पन्नास ऐवजी तीस इतके करण्यासाठी सांगितले. त्यावर लोकसेवक श्री. अहिरे यांनी सांगितले ठिक आहे तीस दया आणि चला ए.टी.एम ला जावून पैसे काढून दया त्यावर मी बोललो की, सध्या माझ्याकडे ए.टी.एम कार्ड नसून पैसे ही नाही. ते मी माझ्या पत्नीकडून पैसे घेवुन लोकसेवक श्री.अहिरे यांना नंतर आणून देणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि विद्या जाधव व सपोआ नितीन जाधव यांनी माझेकडे

समक्ष
(विद्या जाधव)
पोलीस निरीक्षक ,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

दिनांक ३१/०३/२०२३ रोजीचा फिर्यादी श्री उदास दाजी तुळसे यांचा फिर्यादी जबाब पुढे सुरू.....

लोकसेवकाच्या भेटी दरम्यान झालेल्या संभाषणाबबत विचारणा केली असता मी वरीलप्रमाणे हकिगत सांगितली. लोकसेवक श्री अहीरे यांनी बदलीचे आदेश मिळवून देण्याकरीता लोकसेवक श्री मराळे यांचे नावाखाली प्रथम रूपये ५०,०००/– इतक्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती रूपये ३०,०००/– इतक्या लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबूल केल्याचे स्पष्ट झाले. परंतु माझ्याकडे त्यावेळी लोकसेवक श्री अहीरे यांना देण्याकरीता लाचेची रक्कम उपलब्ध नसल्याने लाचेची रक्कम लवकरात लवकर उपलब्ध करून पुढील सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले.

दिनांक १५/१२/२०२२ रोजी मी लाप्रवि कार्यालयात समक्ष हजर राहून माझी आयुक्त दुग्धविकास कार्यालय, वरळी मुख्यालय, मुंबई येथे दिनांक ०१/१२/२०२२ रोजीच्या बदली झालेल्या आदेशाची प्रत मिळालेली असल्याचे पोनि विद्या जाधव यांना सांगून त्याची छायांकीत प्रत सादर केली व माझेकडे अद्यापपर्यंत लाचेची रक्कम उपलब्ध झाली नसल्याचे सांगितले. त्यानंतर काही दिवसांनी पोनि विद्या जाधव यांनी माझे मोबाईलवर संपर्क केला असता, दिनांक १९/१२/२०२२ ते ३०/१२/२०२२ या कालावधीमध्ये नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरू असल्याने लोकसेवक श्री मराळे हे अधिवेशनाकरीता नागपूर येथे गेले असून ते मुंबई परत आल्यानंतर त्यांची भेट घेवू असे पोनि विद्या जाधव यांना सांगितले. त्यानंतर मी माझे वैयक्तीक कामामध्ये व्यस्त असल्याने व लोकसेवकाने मला समोरून संपर्क न केल्याने मी लाप्रवि कार्यालयात हजर राहीलो नाही.

त्यानंतर लोकसेवक श्री मराळे हे शिपाई श्री चाळके यांचे मार्फतीने भेटण्याकरीता निरोप देत असल्याने मी सदरबाबत दिनांक २८/०३/२०२३ रोजी लाप्रवि कार्यालयात हजर राहून पोनि विद्या जाधव यांना सांगितले. त्यावर पोनि विद्या जाधव व सपोआ नितीन जाधव यांनी मला लोकसेवक श्री मराळे यांना प्रथम फोनव्दारे सपंर्क करून लाचे संदर्भात पडताळणी करून पुढील कार्यवाही करणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे दिनांक २८/०३/२०२३ रोजी दोन शासकीय पंचासमक्ष मी लाप्रवि कार्यालयातल गोपनिय कक्षामधून माझे मोबाईल क्रमांक ८६९३८६१९७७ वरून लोकसेवक श्री मराळे यांच्या मोबाईल क्रमांक ९९६७४३६१९९ वर कॉल करून लोकसेवक श्री मराळे यांनी त्यांचे कार्यालयातील शिपाई श्री चाळके यांना मला फोन करण्यास सांगितल्याने मी फोन केला असल्याचे लोकसेवक मराळे यांना सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री मराळे यांनी ते श्री चाळके यांना ओळखत नसून त्यांनी कोणालाही मला फोन करण्यास सांगितले नसल्याचे सांगून फोन कट केला. सदर संभाषणा दरम्यान लोकसेवक मराळे यांनी माझेकडे कोणत्याही लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले नाही. म्हणून सदरची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. पडताळणी कारवाई दरम्यान झालेले संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरव्दारे एस.डी. कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले.

यापुर्वी दिनांक ०९/१२/२०२२ रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री अहीरे यांनी माझेकडे तडजोडी अंती रूपये ३०,०००/– इतक्या लाचेची मागणी केली होती. परंतु सदरची लाचेची रक्कम स्विकारण्याकरीता लोकसेवक श्री अहीरे यांनी मला अद्यापपर्यंत संपर्क केलेला नाही.

तरी दि. ०९/१२/२०२२ रोजी शासकिय पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री अहीरे यांनी माझे बदलीचे आदेश देण्याकरीता त्यांचे कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावाने प्रथम रूपये ५०,०००/– इतक्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती रूपये ३०,०००/– इतक्या लाचेची मागणी करून गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून माझी लोकसेवक श्री प्रशांत दामोदर अहीरे, पद – वरिष्ठ लिपीक, दुग्ध व्यवसाय विकास विभाग (प.दु.म.), ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई यांच्याविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वर नमुद जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो मला मराठीतून वाचून व समाजावून सांगितला असून तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(विद्या जाधव)
पोलीस निरीक्षक ,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

देण्यात आलेले

अंतरिम

(29)

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे
Reasons for delay in reporting by the complainant/informant ...... फिर्यादीकडून

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ...... —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ...... —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी केलेल्या पडताळणीवरुन यातील आरोपि लोकसेवक श्री प्रशांत आहिरे (वरिष्ठ लिपिक) प.दु.म. विभाग, मंत्रालय मुंबई. यांनी फिर्यादी श्री उदास तुळवे यांच्याकडे त्यांचे बदलीचे आदेश देण्याकरिता त्यांचे कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावाने प्रथम रू. 50,000/- इतक्या लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. 30,000/- इतक्या लाचेची मागणी करुन स्वत: करिता गैरलाभ मिळविण्याच्या उद्देशाने लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले म्हणून भ्र.प्र.अधिनियम 1988 कलम 7, 7(अ) अन्वये आरोपी लोकसेवक श्री प्रशांत आहिरे यांचेविरुध्द गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक, विद्या जाधव

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ...... Rank...... No. ...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ...... (3) Transferred to P.S ......, District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ...... विद्या जाधव
पदनाम Rank ...... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ......
Posting ला.प्र.वि. मुंबई
Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ......
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner